# आठही मतदारसंघात एकूण 274 जणांची उमेदवारी दाखल

## शेवटच्या दिवशी 179 उमेदवारांनी दाखल केले नामांकन




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.29 )**- विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी मंगळवारी जिल्ह्यातील आठही मतदारसंघात इच्छुकांची गर्दी झाली होती. शेवटच्या दिवशी 179 उमेदवारांनी अर्ज दाखल केले.

आतापर्यंत एकूण 274 उमेदवारांनी 341 अर्ज सादर केले. प्रामुख्याने आमदार सुलभा खोडके, माजी पालकमंत्री डॉ.सुनील देशमुख, आमदार रवी राणा, आमदार राजकुमार पटेल, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख, शिवसेना जिल्हाध्यक्ष सुनील खराटे, राजेश वानखडे, माजी आमदार वीरेंद्र जगताप, गिरीश कराळे यांच्यासह बंडखोरी करणारे माजी पालकमंत्री डॉ. सरकारच्या विरोधात जगदीश गुप्ता, तुषार भारतीय, रविराज देशमुख, प्रमोद गड्रेल आदींनी अर्ज दाखल केले.

### अखेरच्या दिवसापर्यंत दाखल झालेले नामांकन

| विधानसभा | उमेदवार | नामांकन |
|---|---|---|
| अमरावती | 30 | 37 |
| बडनेरा | 47 | 58 |
| धामणगाव रेल्वे | 28 | 35 |
| तिवसा | 36 | 39 |
| मोर्शी | 32 | 43 |
| अचलपुर | 30 | 39 |
| दर्यापुर | 43 | 58 |
| मेळघाट | 28 | 32 |
| एकुण | 274 | 341 |

### 30 ऑक्टोबर ला नामनिर्देशनपत्रांची छानणी

बडनेरा मतदारसंघातून सर्वाधिक 47 उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. तर धामणगाव रेल्वे मतदारसंघातून सर्वात कमी 28 उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. बुधवार 30 ऑक्टोबर रोजी नामनिर्देशनपत्रांची छाननी होणार आहे. त्यानंतर वैध नामांकनांची संख्या उघड होईल. तर 4 नोव्हेंबर हा नावे मागे घेण्याचा शेवटचा दिवस आहे. त्यानंतर निवडणुकीची स्थिती स्पष्ट होईल. त्याच दिवशी अपक्ष उमेदवारांना निवडणूक चिन्हांचे वाटपही केले जाणार आहे.

# तिवसा विधानसभेतून महायुतीच्या उमेदवारा विरोधात रविराज देशमुखांचे बंड



**महासागर प्रतिनिधी**

**तिवसा, ( दि.29 )** - विधानसभा मतदारसंघात अपक्ष उमेदवार म्हणून रविराज देशमुख यांनी मंगळवारी (29 ऑक्टोबर) रोजी त्यांचा उमेदवारी अर्ज दाखल केला.

माझी ही लढाई पक्ष विरोधी नसून तिवसा विधानसभा मतदार संघातील जुन्या कार्यकर्त्याच्या अस्तित्वाची असल्याचे मत भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा ओबीसी प्रदेश उपाध्यक्ष रविराज देशमुख यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले. ते पुढे म्हणाले की, माझे बंड पक्षाविरोधी नसून येथील स्थानीय स्तरावर काम करणारे कार्यकर्ते ह्यांच्या अधिकारासाठी आहे. मागील 30 वर्षापासून या क्षेत्राचे मी प्रतिनिधित्व करत असून संघटन सशक्तीकरण तसेच सामाजिक स्तरावर केलेल्या कामाची लोक मला मतदानाच्या स्वरूपात पावती देणार. असा विश्वास रविराज देशमुख ह्यांनी व्यक्त केला. माझ्या ह्या लढाईत क्षेत्रातील धार्मिक, सामाजिक, राजकीय तसेच शैक्षणिक संघटनेचा पाठिंबा मिळाला असून हि लढाई आम्हीच जिंकू असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# विक्रम ठाकरे यांचीही अपक्ष उमेदवारी दाखल



**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी( दि.29 )** - वरुड पंचायत समितीचे माजी सभापती विक्रम ठाकरे यांनी मोर्शी विधानसभा मतदारासंघातून आज दि.29 ऑक्टो.रोजी अपक्ष उमेदवार म्हणुन आपल्या समर्थकांसह उमेदवारी अर्ज सादर केला.उमेदवारी अर्ज सादर करतांना उफाळलेला जनसमुदाय विक्रम ठाकरे यांचे राजकीय वजन वाढविणारा ठरला.

ढोल ताशांच्या निनादात काढण्यात आलेल्या नामांकन रॅली दरम्यान ठाकरे यांच्या समर्थनार्थ जोरदार घोषणा देण्यात येत होत्या.शक्ती प्रदर्शनासह काढण्यात आलेल्या विक्रम ठाकरे यांच्या नामांकन रॅलीने विक्रम मोडला.

मोर्शी शहरातील मुख्य मार्ग ठाकरे यांच्या सर्वधर्मीय समर्थकांच्या गर्दीने गजबजुन गेला होता. या मार्गावर ठिकठिकाणी फुलांचा वर्षाव करून व पुष्पहार घालून विक्रम ठाकरे यांचे स्वागत करण्यात आले.खुल्या जीपमध्ये बसून त्यांनी जनतेचे अभिवादन व आशीर्वाद स्वीकारले.हातात विक्रम पर्वचे झेंडे घेऊन हजारोच्या संख्येने कार्यकर्ते रॅलीत सहभागी झाले होते.

# मुलीच्या अपहरण प्रकरणात दोघांना अटक

## मुलीला केले कुटुंबीयांच्या स्वाधीन

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.29 )** - अल्पवयीन मुलीच्या अपहरणानंतर राजापेठ पोलिसांनी 36 तासांत दोन आरोपींना अटक करून, मुलीला सुटका केली. पंकज सुरेश गुल्हाने (37, रा. गजानन नगरी, धामणगाव रोड, यवतमाळ) आणि निलेश हरिदास रोड (34, रूप नगर, बिजवे लेआउट, यवतमाळ) यांचा आरोपींमध्ये समावेश आहे. मुलीला तिच्या नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रहिवासी 42 वर्षीय वडिलांनी तक्रार दिली होती की, 25 ऑक्टोबर रोजी त्यांची अल्पवयीन मुलगी शैक्षणिक कागदपत्रे घेऊन घरातून निघून गेली होती. परंतू रात्री उशिरापर्यंत ती घरी न पोहोचल्याने पालकांनी अल्पवयीन मुलीच्या कॉलेज आणि क्लासमध्ये जाऊन चौकशी केली. तेव्हा ती कॉलेजमध्ये येत नसल्याचे समोर आले. त्यानंतर मोबाईलवर संपर्क साधला असता तिचा मोबाईल बंद असल्याचे आढळले. गणेश कॉलनीत अल्पवयीन मुलीचे मोपेड वाहन उभे असल्याचे दिसले. त्यानंतर अज्ञात आरोपींनी अल्पवयीन मुलीचे अपहरण केल्याची तक्रार वडिलांनी राजापेठ पोलिस ठाण्यात दिली. या प्रकरणाचे गांभीर्य पाहून वरिष्ठ पोलीस निरीक्षक पुनित कुलट यांनी तातडीने या अल्पवयीन मुलीच्या शोधासाठी पथक तयार केले. गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी यवतमाळ जिल्ह्यातील दिग्रस येथे जाऊन आरोपींचा शोध घेतला. तेथून आरोपी पंकज सुरेश गुल्हाने (37, ऑटोचालक, गजानन नगरी, धामणगाव रोड, यवतमाळ) आणि निलेश हरिदास रोड (34, रूप नगर, बिजवे लेआउट, यवतमाळ) यांना अटक करण्यात आली.सदर अल्पवयीन मुलगी नीलेश रोडके यांच्या हॉटेलमध्ये दिसली. पोलिसांनी अल्पवयीन मुलीला अमरावती येथे सुखरूप आणून तिच्या पालकांच्या ताब्यात सुपूर्द केले.

# सराईपुरा येथून शस्त्रासह आरोपीला अटक

## ग्रामीण एलसीबीची कारवाई



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती( दि.29 )**- विना परवाना घरात धारदार शस्त्रे ठेवणाऱ्या आरोपीला ग्रामीण गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अचलपूर येथील सराईपुरा येथून अटक केली आहे. त्याच्याकडून एक कोयता जप्त करण्यात आला आहे. राज विनोद वर्मा (22, सरायपुरा, अचलपूर) असे अटक आरोपीचे नाव आहे.

पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांनी जिल्ह्यातील आगामी विधानसभा निवडणुका लक्षात घेऊन अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. ग्रामीण गुन्हे शाखेचे पथक अचलपूर येथे गस्त घालत असताना सराईपुरा येथील रहिवासी राज वर्मा यांच्या घरात अवैध शस्त्रसाठा ठेवल्याची गोपनीय माहिती मिळाली. पोलिसांनी तत्काळ छापा टाकून घरातून कोयता ताब्यात घेतला. आरोपीला शस्त्र परवान्याबाबत विचारणा केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. पोलिसांनी हे शस्त्र जप्त करून आरोपीला अचलपूर पोलिसांच्या ताब्यात दिले. पोलिसांनी आर्म ॲक्टनुसार गुन्हा दाखल केला आहे.

# कुख्यात चाटीवर एमपीडीए

**अमरावती** - कुख्यात गुन्हेगार राहुल उर्फ चाटी राजू उर्फ राजेश तडस याच्यावर एमपीडीएची कारवाई करण्यात आली आणि त्याची एक वर्षासाठी तुरुंगात रवानगी करण्यात आली. तिवसा व वरुड पोलीस ठाण्याच्या हद्दीत कुख्यात असलेला राहुल उर्फ चाटी राजू उर्फ राजेश तडस हा पोलीस कारवाई करूनही आपल्या कारवाया थांबवत नव्हता. राहुलवर तिवसा आणि वरुड पोलिस ठाण्यात विविध गुन्हे दाखल आहेत. पोलिसांनी अनेकदा कारवाई करूनही तो गुन्हेगारी कारवायांमध्ये गुंतला होता. त्यानंतर पोलीस विभागाने राहुल तडस यांच्यावर एमपीडीए कारवाईचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविला होता.

# कारसह 13 पेट्या देशी दारू जप्त

## ग्रामीण गुन्हे शाखेची कारवाई

**अचलपूर,( दि.29 )** - परतवाडा ते बिहाली रस्त्यावर कारमधून देशी दारूची तस्करी करणाऱ्या आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. ग्रामीण गुन्हे शाखेच्या पोलिसांनी 29 ऑक्टोबर रोजी ही कारवाई केली. पोलिसांनी कार व देशी दारूसह 3 लाख 62 हजार 600 रुपयांचा माल जप्त केला आहे.

ग्रामीण गुन्हे शाखेचे पथक चिखलदरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत असताना परतवाडा ते बिहाली रस्त्यावर एका कारमध्ये देशी दारूची तस्करी होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. पोलिसांनी तातडीने बिहालीजवळ सापळा रचला. ती गाडी आल्यावर ती थांबली. कारची झडती घेतली असता कारमध्ये दारूचे 13 बॉक्स आढळून आले. पोलिसांनी जय हुकूमचंद गोडोंले (24, बंकरपुरा, परतवाडा) आणि रोहित घनशाम यादव (26, रवी नगर, परतवाडा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी कार व दारू असा एकूण 3 लाख 62 हजार 600 रुपयांचा माल जप्त केला आहे. पुढील तपास चिखलदरा पोलिस करत आहेत.

# मविआ समर्थित काँग्रेसचे उमेदवार डॉ. सुनील देशमुख यांचे नामांकन दाखल







## नामांकन रॅलीला अभूतपूर्व प्रतिसाद

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.29 )**- अमरावती विधानसभा मतदार संघाचे इंडिया आघाडी/महाविकास आघाडीचे काँग्रेस चे अधिकृत उमेदवार डॉ.सुनील देशमुख यांनी आपले नामांकन आज मंगळवार दिनांक 29 ऑक्टोंबर 2024 रोजी सकाळी 11.00 वा.दाखल केले. सकाळी सर्वप्रथम धर्मदाय कॉटन फंड कमेटी वालकट कंपाऊंड येथे सकाळी शहरातील नागरिक,सर्व पक्षीय पदाधिकारी,कार्यकर्ते यांनी एकत्रित येऊन डॉ.सुनील देशमुख यांच्या नामांककरिता प्रचंड मोठे शक्तिप्रदर्शन केले.इंडिया आघाडी/महाविकास आघाडीच्या सर्व प्रमुख नेते,पदाधिकारी,कार्यकर्ते यांच्या उपस्थितीमध्ये व शहरातील जणतेच्या आशीर्वादाने नामांकन केले दाखल. यावेळी प्रामुख्याने शिवसेना नेते खासदार अनिल देसाई, माजी पालकमंत्री यशोमती ठाकूर, शिवसेना नेते माजी खासदार अनंतराव गुढे, शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, अमरावती काँग्रेस शहराध्यक्ष बबलू शेखावत, माजी महापौर विलास इंगोले, रिपाईचे नेते राजेंद्र गवई, माजी महापौर मिलिंद चिमोटे, प्रदेश काँग्रेस उपाध्यक्ष भैय्या पवार, प्रदेश प्रवक्ते दिलीप एडतकर, प्रदेश सरचिटणीस किशोर बोरकर यांच्यासह शहरातील अनेक प्रतिष्ठित गणमान्य नागरिक ज्येष्ठ नागरिक, महाविकास आघाडीतील घटक पक्षांचे सर्व पदाधिकारी असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते. सकाळी 11.00 वाजता डॉ सुनील देशमुख यांच्या रॅलीची सुरुवात झाली. ठिकठिकाणी फटाक्यांची आतषबाजीत व पुष्पवर्षा करित अमरावतीकर जनतेने डॉ.सुनील देशमुख यांना आशीर्वाद दिले. माध्यमांशी बोलताना डॉ.सुनील देशमुख यांनी आज पर्यंत अमरावती शहरासाठी आपण केलेले विकासात्मक कामे जनतेचे पाठबळ व महाविकास आघाडीतील घटक पक्षांच्या भक्कम पाठिंब्याने निवडणुकीला सामोरे जात असून. विकास आणि विकास जो अमरावती शहराच्या नागरिकांना डोळ्यांना दिसेल असा आपण आजपर्यंत केलेला आहे. त्याच्याहीपेक्षा दोन पावले समोर जाऊन जनतेचे मूलभूत प्रश्नांवर काम करण्याकरिता आपणही उमेदवारी प्रचंड जनसमर्थनाने व पाठबळाने लढवित असून जनता आपल्या कार्याचा आलेख बघून नक्की माझ्या पाठीमागे प्रचंड मोठी शक्ती उभी करून मला विजय करतील अशी आत्मविश्वासपूर्वक निवेदन केले. या अभूतपूर्व नामांकन दाखल करण्याच्या रॅलीने काँग्रेस पक्षातील व महाविकास आघाडीतील अन्नघटक पक्षांच्या पदाधिकाऱ्यांचा व कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास वाढला असून अधिक जोमाने प्रचाराचे सूत्र हाती घेऊन घरोघरी या भ्रष्टाचारी सरकारला खाली खेचण्याकरिता व डॉ.सुनील देशमुख यांना निवडून आणण्याकरिता प्रयत्नांची शर्थ करण्याचा निर्धार कार्यकर्त्यांनी केला आहे.

# न्याय न मिळाल्याने बेमुदत उपोषण छेडणार घोडेराव कुटूंब

## सासरच्या लोकांनी जिवंत जाळल्याचा आरोप

**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर, ( दि.29 )**- सासरच्या लोकांनी आपल्या मुलीची निर्घृण हत्या केल्याचा आरोप करित आपल्याला न्याय न मिळाल्यास बेमुदत उपोषण छेडण्याचा इशारा येथील घोडेराव कुटूंबियांनी दिला आहे.

साहेबराव घोडेराव यांनी सांगितले की, आपली लहान मुलगी ऋजुजा विपीन कट्यारमल हीचे लग्न दि.13 जून 2023 रोजी मोठ्या थाटामाटात दत्तापूर धामणगाव येथील विपीन वासुदेवराव कट्यारमल ह्याचे सोबत दर्यापूर येथे झाले. त्यानंतर ती विपीन कट्यारमल ह्याचे घरी नांदावयास गेली. काही दिवस त्यांनी तिला चांगली वागणूक दिली. त्यानंतर घरातील सर्व लोकांनी तिला काही ना काही कारणावरून त्रास देणे सुरू केले. 'तु तुझ्या आई-वडीलांकडून चारचाकी गाडी घेण्याकरीता पैसे आण! असा तीच्या मागे तिचा पती विपीन, सासरा वासुदेव, सासू ज्योती, व देर कुणाल कट्यारमल, मोठे सासरे हरिभाऊ कट्यारमल, मोठा भासरा योगेश हरिभाऊ कट्यारमल, लहान देर चेतन हरिभाऊ कट्यारमल या सर्व लोकांनी तिला मानसिक, शारिरिक व आर्थिक त्रास देवून दि. 8 ऑक्टोबर 2024 रोजी अंदाजे मध्यरात्री 1 ते 3 च्या दरम्यान दत्तापूर धामणगाव येथे राहत्या घरी कुटाराच्या खोलीमध्ये तिला जाळले. आम्ही तिला यवतमाळ येथे हॉस्पीटल मध्ये पाहण्याकरीता गेलो त्यावेळेस ती मृत अवस्थेत होती, तीला जाळले होते तेथे पाहणी केली तेव्हा आम्हाला आढळून आले की, तिला कुटारात उभ्या असलेल्या बाजीवर दोनही हाथ दोराने बांधून जाळले असावे. तीचे बुट खाली जळलेले होते, तिला खुप अत्यंत क्रुरतेने जाळल्या गेले असावे असे आम्हाला स्थळ निरीक्षण केल्यावर दिसले आहे. तिला प्रत्यक्ष पाहले तेव्हा मृतकच्या अंगावर कपडे नव्हते, तिच्यावर सामुहिक अतिप्रसंग करून प्रथम तिला फाशी दिली व नंतर तिला जाळले असावे. असा संशय घोडेराव कुटूंबियांनी व्यक्त केला आहे. त्या बाबत योग्य तो सखोल तपास व्हावा. या प्रकरणाची सदर तपासी अधिकाऱ्यांना विचारपुस केली असता त्यांच्याकडून समाधानकारक उत्तर मिळाले नाही व आरोपींवर अजुन पर्यंत कोणतीही कारवाई झालेली नाही. तरी या प्रकरणाची सखोल चौकशी करून प्रचलीत कायद्या नुसार त्वरीत वरील सर्व आरोपींना (गैरअर्जदार) तत्काळ अटक करून त्यांचेवर कठोर शिक्षा व्हावी, अन्यथा न्यायाकरिता आम्हाला बेमुदत उपोषण छेडावे लागेल असा इशारा आई कमल घोडेराव, वडील साहेबराव घोडेराव यांनी दिला आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# मविआ ने उघडले पत्ते, गिरीश कराडेंच्या हाती दिली तुतारी

## शरद पवाराच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून केली उमेदवारी दाखल

### महायुतीमधील दुफळी मविआला लाभदायक ?




**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.29 )** - मागील 8 दिवसांपासून महाविकास आघाडीचा उमेदवार कोण? याकडे मोर्शी-वरुड मतदारसंघाचे नव्हे तर संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागलेले होते. अखेर शेवटच्या क्षणी म्हणजे नामांकन भरण्याच्या अखेरच्या दिवशी (29 ऑक्टोंबर) ला दुपारी 12 वाजता महाविकास आघाडीने आपले पत्ते उघडत काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष गिरीश कराडे यांना राष्ट्रवादी काँग्रेस (शप गट) ची उमेदवारी दिली. अखेर हर्षवर्धन देशमुख यांच्या नेतृत्वात त्यांच्या हातात तुतारी देण्यात आली. घड्याळ आणि कमळ यांच्या विभागल्या गेलेल्या महायुतीमूळे तुतारीचे सुर संपूर्ण मोर्शी-वरुड मतदार संघात गुंजतील यात शंका नाही.

मोर्शी-वरुड मतदार संघाच्या उमेदवारीचा तिढा अखेर सुटला असून भारतीय जनता पार्टी व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट हे मैत्रीपूर्ण लढत, तर त्यांच्या विरोधात महाविकास आघाडीचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाचे उमेदवार म्हणून गिरीश कराळे यांना तुतारी मिळाली आहे. कराळेंनी आज मोर्शी येथे उपविभागीय कार्यालयात नामांकन अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे या मतदारसंघांमध्ये घड्याळ, कमळ व तुतारी यामध्ये खरी लढत होणार असल्याचे बोलल्या जात आहे. महायुतीची उमेदवारी कोणाला मिळणार यामध्येच हा संपूर्ण आठवडा गेला तर महाविकास आघाडीची उमेदवारी मिळण्यासाठी भारतीय जनता पार्टीच्या काही नेत्यांनी सुद्धा प्रयत्न केले होते. त्यात भाजपाचे उमेदवार चंदू उर्फ उमेश यावलकर यांचाही समावेश होता. परंतु या प्रयत्नांना महाविकास आघाडीने थारा न देता काँग्रेस मधीलच निष्ठावान असलेले गिरीश कराळे यांना महाविकास आघाडीची उमेदवारी देऊन तुतारीवर लढण्यासाठी सज्ज केले आहे. त्यामुळे महाविकास आघाडीची बाजू सध्या तरी भक्कम झाली आहे. गिरीश कराळे यांना उमेदवारी मिळाल्यामुळे विरोधकांचे धाबे दणाणले आहे. प्रचाराचा धडाका लक्ष्मीपूजन झाल्यानंतरच सुरू होईल, तर काही उमेदवारांनी आपल्या प्रचाराचा श्रीगणेशा केला आहे.

# संरक्षित यादीत येणाऱ्या वृक्षांची सर्रास कत्तल?

## वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालयाचे ( प्रादेशिक ) दुर्लक्ष







**संतोष भालेराव**

**परतवाडा,( दि.29 )**- परतवाडा तसेच आजूबाजूच्या ग्रामीण परिसरात अनेक मुख्य रस्त्याला लागून असलेल्या गावांमध्ये असलेल्या शेतात ले आऊट टाकून भुखंड विकण्याचा व्यवसाय जोरात सुरू आहे. गावानजीक शेती असल्याने त्यामध्ये अनेक प्रकारचे औषधी वनस्पती वृक्ष व वनविभागाने संरक्षित केलेल्या यादीतील वृक्ष भरपूर प्रमाणात असतात. यामध्ये प्रामुख्याने आंबा, चिंच, बेल वृक्ष, सागवान, कडुनिंब, वड व पिंपळ सुद्धा असतात. परंतु ले आऊट टाकताना व्यावसायीक कुठलाच विचार न करता हे संरक्षित यादीतील अग्रस्थानी असलेले सर्व वृक्षांची सर्रास कत्तल करित त्याची विल्हेवाट लावत आहेत.

गौरखेडा कुंभी ग्रामपंचायत हद्दीतील मौजे नर्सरी येथे गावातीलच पंजाब शिंदे यांनी ले आऊट व्यवसायीकाला त्यांचे गावालगतचे शेत विकले आहे. या शेतात ले आऊट टाकताना शेतातील वृक्षांसोबत लागुनच असलेल्या गावठाण व ग्रामपंचायत च्या ताब्यातील शासकीय जागेवर असलेले संरक्षित यादीत येणारे महाकाय चिंचेचे झाड सुद्धा विनापरवानगी हे लोकं तोडत होते, मात्र आ.राणा यांचे स्वीय सहायक अनुराग बोरेकार यांच्या समयसूचकते मुळे त्या झाडाची कत्तल होण्यापासून वाचले. हा प्रकार वनपरिक्षेत्र अधिकारी प्रादेशिक परतवाडा यांच्या लक्षातसुध्दा आणून देण्यात आला. परंतु वनपरिक्षेत्र अधिकारी प्रादेशिक परतवाडा यांचे कार्यालयातून संरक्षित यादीत येणाऱ्या वृक्षांची कत्तल करण्याची परवानगी कोण देतं आहे, हे पाहणेही महत्वाचे ठरेल. गौरखेडा कुंभी गावात राहणारे लोक जास्तीत जास्त शेतकरी आहेत, ते म्हणतात की आम्ही आमच्या शेतातील बांधावर असणारे निरूपयोगी वृक्ष तोडण्यासाठी परवानगी मागायला वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालयात जातो, तेव्हा आम्हाला सहा-सहा महिने परवानगी दिली जात नाही.

याउलट हे बिल्डर लोकांना संरक्षित यादीत येणाऱ्या विविध प्रकारच्या औषधी वनस्पती वृक्ष तोडण्याची परवानगी लगेच देतात. काही ठिकाणी तर एक वृक्ष तोडण्याची परवानगी घेऊन आजुबाजुला असलेल्या सर्वच वृक्षांची सर्रास कत्तल केली जाते, त्यामुळे वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष द्यावे अशीही मागणी गावकरी करत आहेत.

### बनावट कागदपत्राच्या आधारे वृक्ष कत्तल

गौरखेडा कुंभी ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या ग्राम नर्सरी येथील गावठान अंतर्गत येत असलेले चिंचेचे झाड बनावट कागदपत्रे बनवुन पंजाब शिंदे यांनी झाड तोडण्याचा प्रयत्न केला. संबंधित झाड हे गावठान अंतर्गत येत असून पंजाब शिंदे यांचा चिंचेच्या झा ?शी कुठलाही संबंध नाही, तसेच त्या संबंधित कुठलेही कागदपत्र त्यांचे कडे उपलब्ध नाही. तरी सुद्धा चिंचेचे झाड कोणत्या नियमाच्या आधारे तोडण्यात आले, असा प्रश्न निर्माण झाला आहे. सदर चिंचेचे झाड शेत मोजनी 'क' प्रत प्रमाणे बाहेर आहे. ते 'क' प्रत मध्ये नमूद नसल्यामुळे गावठान मध्ये येत आहे. पंजाबराव शिंदे हे त्यांच्या शेता लगतचे झाड कोणत्या आधारे तोडत आहे, विषयाशी निगडीत संबंधित अधिकारी यांनी कोणत्या दस्त ऐवजाच्या आधारे मंजूरी दिली, असा प्रश्न निर्माण झाला आहे. मुख्य वन संरक्षक अधिकारी यांनी तत्काळ चौकशी करून संबंधित व्यक्तिवर कार्यवाही करण्याची मागणी अनुराग बोरेकार यांनी केली आहे.

# डॉ.निलेश विश्वकर्मा यांचा नामांकन अर्ज दाखल





**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे,( दि.29 )**- वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ.निलेश विश्वकर्मा यांनी मंगळवारी (ता.29) चांदूर रेल्वे उपविभागीय अधिकारी कार्यालय येथे आपला नामांकन अर्ज दाखल केला. त्यानंतर वंचित बहुजन आघाडीच्या स्थानिक कुऱ्हा रोड वरील कार्यालय येथुन भव्य रॅली काढण्यात आली.ही रॅली संपूर्ण शहारातुन फिरून जुना मोटर स्टॅण्ड चौकात जाहिर सभा घेण्यात आली.यावेळी धामणगाव रेल्वे विधानसभा मतदार संघातील चांदूर रेल्वे,धामणगाव रेल्वे व नांदगाव खंडेश्वर येथील वंचित बहुजन आघाडी,युवा व महिला आघाडीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी व्यासपीठावर वंबआ चे राज्य उपाध्यक्ष ॲड.प्रियदर्शी तेलंग,भाबौम चे राज्य उपाध्यक्ष विजय कुमार चौरपगार, सौ.प्रियंका विश्वकर्मा, आनंद इंगळे, अशोक मोहोड,प्राजक्ता पिल्लेवान, बाबाराव गायकवाड, सिध्दार्थ भोजने, प्रा.रवींद्र मेंढे,मधुकर शेलार, चंदू उके, संतोष पांडे, कपिल पडघन, नारायण परतेकी, प्रशांत नाईक, नासीर खान आदींसह अन्य पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी आयोजित सभेमध्ये राष्ट्रवादी, कॉंग्रेस व भाजपाचे कार्यकर्ते व पदाधिकारी यांनी वंचित बहुजन आघाडीमध्ये जाहिर प्रवेश केला. त्यांचा डॉ.निलेश विश्वकर्मा यांनी पक्षाचा दुपट्टा देवुन पक्षात जोरदार स्वागत केले.धर्मापूर, नांदगाव खंडेश्वर येथील सुभाष शिंदे, सुखदेव पवार, राजेश पवार, शैलेश देवतळे, सुधाकर पवार, अशोक पवार, शुभम पवार, बाळु ढाये व जुना धामणगाव येथील प्रभाकर वरठी, संतोष विश्वकर्मा, दीपक विश्वकर्मा, चांदूर रेल्वे तालुक्यातील बग्गी चे आदित्य वानखडे, विशाल वानखडे यांचा समावेश आहे.

### आलटून-पालटून सत्ता उपभोगणाऱ्यांना घरी बसवा

गेल्या पंचेचाळीस वर्षापासुन धामणगाव रेल्वे मतदार संघामध्ये भाजप व कॉंग्रेस या दोन आमदारांची सत्ता होती. मात्र मतदार संघात कुठल्याही प्रकारचा विकास झाला नाही. उलट दोघांनी टक्केवारीचे राजकारण करून मतदार संघाचा विकास खुंटवला. उद्योगधंदे, बेरोजगारी यांना तडा देऊन मतदार संघाचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले. दोघांनाही धडा शिकविण्यासाठी मला साथ द्या असे आवाहन डॉ.निलेश विश्वकर्मा यांनी स्थानिक जुना मोटर स्टॅंड चौक येथे झालेल्या जाहिर सभेत केले.

# 11 नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या हिवाळी परीक्षा स्थगित

**अमरावती** - अमरावती विद्यापीठाच्या हिवाळी 2024 च्या दुसऱ्या टप्यातील परीक्षा 11 नोव्हेंबरपासून सुरू होणार होत्या. परीक्षांचे वेळापत्रक देखील विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द विद्यार्थ्यांनी नोंद घेण्याचे आवाहन विद्यापीठाच्यावतीने करण्यात आले . या परीक्षांच्या तारखा जाहीर करण्यात आल्या होत्या. परंतु काही अपरिहार्य कारणांमुळे सदर परीक्षा तुर्त स्थगित करण्यात आली. सुधारित वेळापत्रक लवकरच जाहीर करण्यात येईल, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितिन कोळी यांनी कळविले आहे. यासंदर्भात परीक्षा विभागाकडून सर्व संलग्नित महाविद्यालये, प्राचार्य, केंद्राधिकारी, परीक्षा केंद्रांना पत्राव्दारे कळविण्यात आले असून याची सर्व संबंधित विद्यार्थी व महाविद्यालयांनी नोंद घ्यावयाची आहे. तसेच काही अडचण असल्यास परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांचेशी संपर्क साधता येईल, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे. यामध्ये 26 डिसेंबरपासून तिसर्या टप्यातील परीक्षा सुरू होणार असून, त्या परीक्षा यापूर्वी घोषित वेळापत्रकानुसार घेण्यात येणार आहे.

### राजू बसवनाथे, ज्योती राठोड यांच्या कार्याचा गौरव

**अमरावती** - प्रभात सिनेमागृह संचालक प्रकल्प राठी व डॉ. गोविंद कासट मित्र मंडळाच्या वतीने मराठी चित्रपट सत्यशोधकचे आयोजन करण्यात आले होते. मध्यंतरात शहरातील बडनेरा येथील निवासी बेघर गृह येथे निराधार निराधित, स्मरणशक्ती व हरवलेले वृद्धांना आश्रय देणारे राजू बसवनाथे व राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त ज्योती राठोड यांना चित्रपटाच्या मध्यंतरात सत्कार करण्यात आला.

# सिध्दार्थ कनिष्ठ महाविद्यालयाचा हर्षल डाहे राज्य स्तरावर



**महासागर प्रतिनिधी**

**परतवाडा,( दि.29 )** - अमरावती जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अमरावती विभागामार्फत आयोजित विविध क्रीडा स्पर्धा अमरावती येथील शिवाजी शिक्षण महाविद्यालयाच्या प्रांगणावर सुरु आहेत. या स्पर्धेमध्ये राहुल व्यायाम प्रसारक मंडळ अमरावती द्वारा संचालीत सिध्दार्थ विद्यालय कनिष्ठ महाविद्यालय परतवाडा येथील हर्षल पांडूरंग डाहे या विद्यार्थ्यांने 2.70 मिटर बांबू उडी क्रीडा स्पर्धामध्ये प्रथम क्रमांक पटकाविला. त्यामुळे त्याची आता पुणे येथे होणा-या राज्यस्तरीय उंच उडी क्रीडा स्पर्धा करीता निवड झाली आहे.

विभागस्तरीय वैयक्तिक मैदानी क्रीडा स्पर्धा बांबू उडी स्पर्धा जवाहरलाल नेहरू जिल्हा क्रीडा संकुल यवतमाळ या ठिकाणी आयोजित करण्यात आली होती. राज्य स्तरावर हर्षल डाहे या विद्यार्थ्यांची निवड झाल्यामुळे सर्वच स्तरावरुन अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. राज्य स्तरावर होणाऱ्या स्पर्धेकरिता संस्थेचे अध्यक्ष क्षितिज अभ्यंकर, संचालीका शुभांगी अभ्यंकर, सचिव गजाननराव वानखडे, प्राचार्य दिनेश मोहोड यांनी हर्षल डाहे याचे अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या. तसेच क्रीडा शिक्षक तथा प्रशिक्षक विनायक डोईफोडे, दीपक कळसकर, विभाग प्रमुख जयश्री खडके, विशाखा गाडगे यांनीही अभिनंदन व कौतुक करुन राज्यस्तरावर होणा-या स्पर्धेकरीता हर्षल ला शुभेच्छा दिल्यात.

### शिक्षणासोबत क्रीडा क्षेत्राचीही आवड आवश्यक

या करीता संस्थापक अध्यक्ष मधुकरराव अभ्यंकर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व म्हणाले की, शालेय शिक्षणासोबत क्रीडा क्षेत्रातही आवड असणे गरजेचे आहे. तेव्हाच कुठे सर्वांगिण विकासाचे धेय पूर्ण होते. व शासनस्तरावर सुध्दा त्याची दखल घेतली जाते. या शाळेतील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात रुची निमार्ण व्हावी या करीता सिध्दार्थ विद्यालय हे विद्यार्थ्यांवर लक्ष केंद्रीत करत असल्याचे अभ्यंकर यांनी सांगितले.

# महाविकास आघाडीकडून सुनील खराटे यांचे नामांकन दाखल

## बडनेरा सर करण्याचा निर्धार







**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.29 )**- गेल्या काही वर्षांपूर्वी शिवसेनेचा बालेकिल्ला असलेल्या बडनेरा विधानसभा मतदारसंघात यावेळी परिवर्तन घडविण्याचा निर्धार करीत हा बालेकिल्ला पुन्हा एकदा काबीज करण्याचा संकल्प महाविकास आघाडीचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, काँग्रेस,राष्ट्रवादी काँग्रेस व अन्य घटक पक्षांनी केला आहे. बडनेरा विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडी व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अधिकृत उमेदवार सुनील खराटे यांनी शक्तीप्रदर्शनात मंगळवारी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. तत्पूर्वी साईनगर स्थित महेश भवन येथे झालेल्या जाहीर सभेत उपस्थित महाविकास आघाडीचे नेत्यांनी विद्यमान आमदारावर हल्लाबोल करीत निष्क्रिय आमदाराला घरी पाठविण्याचा निर्धार केला तसेच मतदारसंघाच्या विकासासाठी परिवर्तन घडविण्याचे आणि सुनील खराटे यांना विजयी करण्याचे आवाहन केले. शिवसेना संपर्कप्रमुख सुधीर सूर्यवंशी यांच्या उपस्थितीत झालेल्या नामांकन जाहीर सभेस माजी खा. अनंत गुढे, माजी आ. प्रदीप वडनेरे,शरद पवार गटाचे शहराध्यक्ष डॉ.हेमंत देशमुख, काँग्रेस नेते हरिभाऊ मोहोड, शिवसेनेचे महानगर प्रमुख पराग गुढधे,माजी नगरसेवक प्रशांत वानखडे, डॉ. तायडे, जयश्री कुर्हेकर, अर्चना धामणे, ललित झंजाळ, याह्या खान पठाण,आसावरी देशमुख माकपाचे सुभाष पांडे,अशोक सोनवणे,श्याम धाने पाटील, ज्योती अवघड, मनीषा टेंबरे, प्रतिभा बोपशेट्टी, कांचन ठाकूर,जयश्री जटाळे मोहम्मद साबीर भाई,बाळा तळोकार, अक्रम देशमुख,शाहीन शाह आदी मान्यवर उपस्थित होते.

### दुचाकी रॅलीने वेधले लक्ष

जाहीर सभेनंतर महाविकास आघाडी व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे अधिकृत उमेदवार सुनील खराटे यांच्या समर्थनार्थ दुचाकी रॅली काढण्यात आली. महेश भवन येथून प्रारंभ झालेली ही रॅली समर्थ हायस्कूल, मुधोळकर पेठ, बालाजी प्लॉट, रवी नगर, नवाथे,कवर नगर, दस्तूर नगर, रंगोली हॉटेल या प्रमुख मार्गाने मार्गक्रमण करीत राजापेठ स्थित मुख्य प्रचार कार्यालयात दुचाकी रॅलीचा समारोप झाला. या रॅलीत खुल्या जीपवर स्वार सुनील खराटे हे मतदारांचे व समस्त बडनेरा- अमरावतीकरांचे आशीर्वाद घेत होते तर विविध चौकात त्यांचे उत्स्फूर्त असे स्वागत करण्यात येत होते. या रॅली नंतर सुनील खराटे यांनी शिवसेना नेते खा. अनिल देसाई, माजी खा. अनंत गुढे, सागर देशमुख, माजी आ.प्रदीप वडनेरे, पराग गुडधे यांच्या उपस्थितीत तहसील कार्यालयात आपला नामांकन अर्ज दाखल केला. रॅलीमध्ये हजारो दुचाकी वाहनधारक सहभागी झाले होते. या रेकॉर्ड ब्रेक रॅलीने संपूर्ण शहराचे लक्ष वेधून घेतले होते.

